21:05

# चिंचवड येथे प्रतिभा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सायबर जनजागृती...

Posted By: news pcmc on: August 21, 2025
In: ठळक घडामोडी, पिं चिं शहर व उपनगर वार्ता, शैक्षणिक
Print Email



## न्यूज पीसीएमसी नेटवर्क

**चिंचवड (दि. २१ ऑगस्ट २०२५) :- सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांमुळे सायबर सुरक्षिततेविषयी जनजागृती करण्यासाठी प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज (कमला एज्युकेशन सोसायटी) यांच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला आहे.**

क्विक हील फाउंडेशनच्या *"सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा"* या उपक्रमाच्या माध्यमातून संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली निगडी येथे हा अभियान राबविण्यात आला.

या जनजागृती मोहिमेत प्रतिभा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पोलिस कर्मचाऱ्यांसह नागरिकांशी संवाद साधत सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक खबरदारीबाबत माहिती दिली. विशेषत: संशयास्पद लिंक, ओटीपी शेअर करणे, अनोळखी कॉल्स व ईमेलद्वारे होणाऱ्या फसवणुकीसंदर्भात जागरूकता